## नियमित दिवाणी कज्जा नं.७९/२०१४ मधील निशाणी क्र.५३ खालील आदेश.

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी 'ज्यादा कैफियत' देण्यास परवानगी मिळयाकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार, वादी यांनी याकामी दि. ०६/०६/२०१६ रोजी दावा दुरुस्ती अर्ज दिला होता. मात्र, सदर दावा दुरुस्ती अर्जान्वये, अर्ज मंजूर झाल्यावर वादीने दाव्याची दुरुस्ती प्रत याकामी दिलेली नाही. त्यामुळे, प्रतिवादीस सदर दुरुस्ती अर्जाच्या अनुषंगाने 'ज्यादा कैफियत' अभिलेखावरती दाखल करता आली नाही. प्रस्तुत, प्रकरणी 'ज्यादा कैफियत नाही' असा आदेश पारित झालेला नाही. प्रस्तुत, प्रतिवादीची 'ज्यादा कैफियत' अभिलेखावर येणे कायदयाने गरजेचे आहे. त्यामुळे, वादीवरती कोणताही अन्याय होणार नाही. याऊलट, तसे न झाल्यास प्रतिवादीवर अन्याय होणार आहे. सबब, सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

३. सदर अर्जास वादीचे विधिज्ञ यांनी म्हणणे दाखल केले असून, प्रतिवादींना दाव्यातील दुरुस्तीबाबत माहिती होती. त्यामुळे, अर्जातील कारणे खोटी असल्याने अर्ज नामंजूर करावा अशी वादीने विनंती केली आहे.

४. वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस.एस.केस्तीकर व प्रतिवादींचे विधिज्ञ श्री. ए.पी. पास्ते यांचा युक्तिवाद ऐकला.

५. अभिलेखाची पाहणी करता, प्रस्तुत प्रतिवादींविरुध्द 'ज्यादा

कैफियत' नाही असा कोणताही आदेश पारित झालेला नाही असे दिसून येते. निश्चितपणे, वादीने वादपत्रामध्ये केलेल्या दुरुस्तीच्या अनुषंगाने प्रतिवादीस त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे उल्लंघन केल्यासारखे होईल. सबब, प्रस्तुत प्रतिवादी यांच्याविरुध्द कोणताही 'म्हणणे नाही' असा आदेश नसल्याने प्रतिवादींना 'ज्यादा कैफियत' देण्याची संधी देणे योग्य राहील. सबब, वरील सर्व कारणांचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

**- आदेश -**

१. अर्ज (निशाणी क्र. ५३) मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींची ज्यादा कैफियत दाखल करुन घेण्यात येते.

३. खर्चासंबंधी कोणताही आदेश नाही.

Amol Bharat Jawale
Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2022.06.24 17:35:27 +0530

कागल. (**ए.बी.जवळे**)

दिनांकः– २३/०६/२०२२ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.